नियमित दिवाणी दावा क्र.७१/२०१६
मनकर्णाबाई वि. अंतेश्वर व इतर
नि.क्र.११७/ क (सोबत)

प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.२

**पुढील सरतपासणी प्रतिवादीतर्फे वकील श्री. पी.एल. नरहरे यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

१. अंतेश्वर मल्लेशा यांनी कालीदास लवटे यांच्याकडून जी जमीन खरेदी केली आहे, ती दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जे खरेदीखत दाखवण्यात आले, ते तेच असून त्यातील मजकूर बरोबर आहे व त्यावर लिहून देणार म्हणून कालीदास लवटे यांची व साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यास **नि.क्र.११८** देण्यात येत आहे.

**उलट तपासणी वादीतर्फे वकील श्री. एच. व्ही. गायकवाड यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

२. सदरचा दावा कोणादरम्यान चालू आहे याबाबत मला माहिती नाही. मनकर्णाबाई कोण आहे याची मला माहिती नाही. केवळाबाईशी माझा परिचय नाही. मी वादी व प्रतिवादी यांना ओळखत नाही, परंतु मी अंतेश्वर मल्लेशा यांना ओळखतो. अंतेश्वर यांना एकच भाऊ आहे एवढेच मला माहीत आहे. मी पुणे येथे राहतो, परंतु ५-६ वर्षापासून मी गावाकडे राणी अंकुलगा येथे राहतो. अंतेश्वरच्या बायकोला मी ओळखतो, परंतु तिचे नाव मला आठवत नाही. अंतेश्वरचे लग्न कधी झाले हे मला आठवत नाही. अंतेश्वरला एक मुलगा व एक मुलगी आहे. त्यांच्या मुलाचे नाव महेश आहे व मुलीचे नाव मुन्ना आहे. त्यांच्यामध्ये कोण मोठे आहे हे मला माहीत नाही. अंतेश्वरची बायको कवठा येथील आहे.

३. अंतेश्वरच्या पत्नीच्या नावे कवठा येथे जमीन होती. त्या जमिनीचा सर्वे नंबर मला माहीत नाही. सदर जमिनीचे क्षेत्र निश्चीतपणे मला सांगता येत नाही. सदर जमीन त्यांनी कोणाला, किती रुपयाला व केव्हा विक्री केली याबाबत मला माहिती नाही. सदर व्यवहाराला मी साक्षीदार नव्हतो. सदर व्यवहाराबाबत मला अंतेश्वरने सांगितले. सदर जमीन विक्री करुन किती रक्कम आली होती याबाबत मला सांगितली नाही. अंतेश्वर शेती करतो. त्यांची वडीलोपार्जित अंदाजे ७ एकर जमीन आहे. सदर जमिनीचे उत्पन्न अंतेश्वर व त्यांचा भाऊ मिळून घेत आहेत. सदर उत्पन्नातून आलेल्या रक्कमेचे ते काय करतात याची मला माहिती नाही. त्यांच्या शेताच्या आलेल्या उत्पन्नातून त्यांन जमीन घेतली आहे किंवा नाही याबाबत मला माहिती नाही.

४. जनकेश्वर कोण आहे याची मला माहीत नाही. नि.क्र.११८ वर असलेले खरेदीखत कोणत्या सर्वे नंबर संदर्भात झाले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावर काय लिहीले आहे हे सध्या मी सांगू शकत नाही. सदर जमिनीचे खरेदीखत किती तारखेला झाले याची मला माहिती नाही. सदर खरेदीखत सन १९९८ किंवा १९९९ साली झाले आहे. त्यावेळी सदर जमिनीचा काय भाव ठरला होता हे मला लक्षात नाही. सदर जमिनीच्या खरेदीखतावेळी पैशाची देवाणघेवाण माझ्यासमक्ष झाली नाही. खरेदीखताच्यावेळी अंतेश्वरची बायको हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अंतेश्वर व त्याच्या भावामध्ये आजतागायत वाद मिळकतीसंदर्भात वाटणी झालेली नाही. साक्षीदार सांगतो की, त्यांच्यात वाटणी झालेली आहे. खरेदीखतातील जमीन वाटणीच्यावेळी अंतेश्वरच्या हिश्याला आली होती.

अंतेश्वरच्या बहिणीचे नाव मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अंतेश्वर व त्याच्या बहिणीमध्ये वाद मिळकतीच्या वाटण्या आजतागायत झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीपैकी नि.क्र.११८ मधील जमीन हे एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अंतेश्वरच्या कुटूंबाच्या व्यवहाराबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास – संपला. फेरतपास – नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.०८/०८/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.